# राज्यात २०१२ आणि २०१४ पेक्षाही भीषण दुष्काळ माणसाने केलेल्या पापांचा घडा भरू लागला

**संपादकीय**
**जयश्री खाडिलकर-पांडेकृत**

यंदाचे वर्ष आणि पुढील वर्ष हे निवडणुकांचे वर्ष मानले जाते. केंद्रात आणि राज्यात कुणाची सत्ता येणार यावरच सर्वांचे लक्ष असून नेते त्यानुसार कार्यक्रम घेऊ लागले आहेत. पण हे वर्ष आणि पुढील वर्ष निवडणुकीचे वर्ष नसून भयंकर दुष्काळाचे वर्ष आहे. २०१२ आणि २०१४ सालच्या दुष्काळापेक्षाही भयंकर दुष्काळाने यावर्षी महाराष्ट्राला विळखा घातला आहे. पिकाचे हमीभाव आणि जलयुक्त शिवार हे शब्द आता बिनअर्थाचे आहेत. आता दोनच प्रश्न आहेत की, शेतकरी जगायचा कसा? आणि त्याच्या पोटात अन्नाचा कण जावा यासाठी रोजगार हमीची कोणती कामे हाती घ्यायची? हे प्रश्न लवकर सोडवले नाहीत तर २०१८ आणि २०१९ या दोन वर्षांत महाराष्ट्रात हाहाकार माजेल.

महाराष्ट्राने विकासाच्या नावाखाली निसर्गाला हवे तसे ओरबाडले. समुद्र किनारच्या कांदळवनावर भराव टाकून इमारती उभ्या केल्या. पंतप्रधान आवास योजनेकरिता गायरान जमिनींवर बांधकामाची परवानगी दिली, हरितलवाद अपयशी ठरला. जंगलातून रस्ते मंजूर झाले, कारशेड उभारण्याचे नियोजन झाले, बांधकामासाठी डोंगर सपाट केले, वाळूसाठी नद्यांवर अत्याचार केले. आता अशी परिस्थिती आहे की, जंगल, डोंगर, शेतजमीन काहीही असो त्यावर वाटेल तशी बांधकामांना परवानगी मिळते. माणसाने विज्ञानात प्रगती केली. ऋतुचक्र जाणले, किड्यापासून माणसापर्यंतच जीवनचक्र समजले आणि ही चक्र जपली नाहीत तर विनाश होईल हेही कळले. पण विज्ञानाने जे शहाणपण दिले ते स्वार्थाने बुडविले. जी जीवनचक्रे जपायला पाहिजेत त्या चक्रांची प्रत्येक साखळी आपण तडातड तोडत सुटलो आहोत. माणसाच्या या शंभर पापांचा घडा आता भरत आला आहे आणि त्याचा परिणाम म्हणजे सतत पडणारा दुष्काळ माणसाला उद्ध्वस्त करू लागला आहे.

यावर्षी शंभर टक्क्यांहून अधिक पाऊस पडेल असे सपशेल असत्य वक्तव्य हवामान खात्याने केले होते. प्रत्यक्षात सरासरीच्या केवळ ९१ टक्के पाऊस पडला. हवामान खात्याने निवेदन केले की, त्यांचा अंदाज केवळ ६ टक्क्यांनी चुकला. हवामान खात्याच्या अंदाजांवर चर्चा करण्यातही अर्थ नाही. हवामान योग्य सांगू शकेल अशी यंत्रणा बसेपर्यंत हे खातेच बंद करावे हा एकमेव मार्ग आहे. पाऊस कमी पडल्याने सध्या मराठवाड्यात केवळ २६ टक्के पाणीसाठा आहे आणि विदर्भात केवळ ४७ टक्के पाणीसाठा आहे. ऑक्टोबर महिन्यात ही स्थिती आहे.

पुढल्या जूनला पाऊस येईपर्यंत मधील ९ महिने या अत्यल्प पाणीसाठ्यावर काढायचे आहेत. त्यातच ऑक्टोबर महिन्यात तापमानाने उच्चांक गाठला आहे. रणरणत्या उन्हात साठलेल्या पाण्याच्या वाफा होऊन पाणीपातळी आणखी कमी होणार आहे. मराठवाडा, विदर्भच नाही तर सातारा जिल्ह्यातील माण, खटाव, नाशिक येथेही हीच परिस्थिती आहे. इथून पुढे करणार काय? २०१४ ला लातूरला पाण्यासाठी ट्रेन गेली होती. यावर्षी सर्वच जिल्हे ट्रेनची मागणी करणार आहेत. किती आणि कुठून पाणी पुरवणार? आज नाशिक आणि नगरच्या धरणातून जायकवाडीत पाणी सोडले तेव्हा विरोध झाला नाही. पण जानेवारीनंतर जर पाणी सोडण्याची वेळ आली तर जोरदार विरोध होईल. आमचे पाणी का नेता? म्हणत धरणाच्या पाण्यात जलसमाधीची आंदोलने गेल्या दुष्काळात झाली होती तशी यावेळी अधिक उग्र स्वरूपात होतील.

मराठवाड्यात, विदर्भात ऑक्टोबर महिन्यातच १५ दिवसांनी, ८ दिवसांनी एकदा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होतो आहे. हे संकट तर वाढणारच आहे, पण पाण्याबरोबर आणखी एक तितकेच गंभीर संकट ओढवले आहे. यावर्षी शेतात अन्नाचा कण उगवला नाही आणि घरात पैशाचं नाणं नाही अशी स्थिती आहे. यंदाच्या पावसाने अशी ओढ घेतली की, खरीपाचे पीक गेले आणि रब्बीची तर पेरणीही होणार नाही. शेतकरी पूर्ण कोलमडला आहे. शेतकऱ्याचेच घर अन्नावाचून रिकामे होणे यापेक्षा कोणतीही वेदना मोठी नाही. त्यामुळे यावेळी कर्जमाफी, वीज बिलमाफी, पाणीपुरवठा हे प्रश्न सोडवायचे आहेतच, पण शेतकऱ्याला अन्नधान्य विकत घेता यावे यासाठी रोजगार हमीची कामे सुरू करून त्यांच्या हाती पैसा पोहचेल याचे नियोजन करायचे आहे. हे सर्व वेगाने झाले पाहिजे. निवडणुका येतील-जातील, पण शेतकरी पुरता मेला तर राज्य स्वबळावर कधी पुन्हा उभे राहू शकणार नाही.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आमच्या परिसरात दुष्काळ नाही म्हणून कुणीही निर्धास्त राहू नये. शरीराचा एक अवयव दुखायला लागला की पूर्ण शरीर दुखते. दुष्काळी भागाला आपला मानण्यास तयार नसाल तरी त्याच्या वेदना सर्वांना सोसायला लागणार आहेत. घरात दाणा नाही, प्यायला पाणी नाही म्हटल्यावर ही माणसं लोंढ्यानं जिथे दुष्काळ नाही तिथे धाव घेतील, तिथे नोकऱ्या शोधतील, कामं शोधतील, निवारा शोधतील. हे लोंढे यावेळी वाढणार आहेत. जो भाग दुष्काळी परिसर नाही त्यांना या लोढ्यांची काळजी घ्यावी लागेल. इतके लोंढे आले तर पाणीपुरवठ्यापासून भाज्यांच्या दरापर्यंत सर्वांवर परिणाम होणारच आहे. हा परिणाम सोसावाच लागणार आहे. कारण ती माणसं आपली माणसं आहेत. घरावर संकट कोसळले आहे. सर्वांनी एकत्र येऊन त्याविरोधात लढायचे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात निदान इतकी अपेक्षा ठेवायला हरकत नाही.